सातारा जिल्हा परिषद, सातारा
जा.क्र. सा.जि.प.मु./६७/२०१९
दिनांक : ४/१२/२०१९

# परिपत्रक

जिल्हा परिषद मुद्रणालय, सातारा हे जिल्हा परिषद सातारा यांचे मुद्रणालय असून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मध्ये सूचित केलेले रजिस्टर व फॉर्म्सचा पुरवठा मागणीप्रमाणे विविध जिल्हा परिषदांना त्यांच्याकडून केला जातो. या मुद्रणालयास ग्राम विकास विभाग पत्र क्रमांक संकीर्ण १०८५/४१–सीआर–१५५४/२६ दि. ३०/१०/८५ अन्वये चालविण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

तसेच महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागपरिपत्रक क्रमांक झेडपीए १०९४/प्र.१७१४/३३ मंत्रालय मुंबई ४०० ०३२, दि.२ मार्च १९९५ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ च्या नियमांच्या अधीन राहून सर्व जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी त्यांना लागणाऱ्या रजिस्टर व फॉर्म्सची छपाई व खरेदी जिल्हा परिषद मुद्रणालय, साताराकडून निविदा न मागविता करण्यास अनुमती प्राप्त आहे.

सातारा जिल्हा परिषद मुद्रणालयामध्ये ऑफसेट यंत्रावर छपाई करणेत येत असुन विभागांच्या मागणीनुसार छपाई करुन दिली जाते. जिल्हा परिषद मुद्रणालयामध्ये नव्याने डिजीटल कलर प्रिंटर (मल्टी फंक्शन मशिन) खरेदी केलेले असुन या मशिनवर अत्याधुनिक पद्धतीने छोट्या प्रमाणात आवश्यक असणारी रंगीत छपाई जसे की, २२० जीएसएम पेपर पर्यंत व्हीजीटींग कार्ड, ग्रिटींग कार्ड, निमंत्रण पत्रिका, स्टिकर्स, प्रमाणपत्र इत्यादी छपाई तातडीने करता येणे शक्य होणार आहे.

या परिपत्रकान्वये आपणास अवगत करणेत येत आहे की आपले विभागाचे वरील छपाई करणेसाठी जिल्हा परिषद मुद्रणालयातील श्री. आर.आर यंदे, सहाय्यक डी.टी.पी. व्यवस्थापक (मो.क्र. ९७६३०९१०४०) यांचेशी संपर्क साधणेबाबत आपले अधिनस्त कर्मचारी / अधिकारी यांना सूचना देणेत येऊन जिल्हा परिषद मुद्रणालयामार्फतच सर्व छपाईचे काम करुन घ्यावे; तसेच मुद्रणालयाची मागील थकबाकीची रक्कमही तातडीने भरणा करावी.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद
**#9422993333**
**ceozpstr@gmail.com**

प्रति,

सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद, सातारा
सर्व गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा